Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
१७.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १३७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### मान्सूनची वाटचाल ठप्प!



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यभरात पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या नागरिकांसाठी निराशाजनक बातमी आहे. नैऋत्य मोसमी पावसाची वाटचाल सध्या मंदावली असून पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्रातील बहुतांश भागांना उष्णतेच्या लाटा आणि दमट हवामानाचा सामना करावा लागणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, प्रशांत महासागरात विकसित होत असलेल्या अल निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनचा वेग कमी झाला असून जून महिन्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या आठवडा भरापासून महाराष्ट्रातील मान्सूनची प्रगती जवळपास ठप्प झाली आहे.

## वडाळ्यात इंधन चोरीचा पर्दाफाश

# अन्न, नागरी पुरवठा विभागाची धडक कारवाई

### १.३१ कोटींचा मुद्देमाल जप्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दक्षता पथकाने वडाळा येथे धडक कारवाई करत पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधन (एटीएफ) चोरीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला.

या कारवाईत सुमारे १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एका व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले असून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

अन्न, नागरी पुरवठा विभागाचे नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १६ जून २०२६ रोजी दक्षता पथकाने वडाळा परिसरात छापा टाकला.

कारवाईदरम्यान दोन इंधन टँकरचे सील तोडून त्यातील इंधन प्लास्टिक कॅनमध्ये भरून चोरी केली जात असल्याचे आढळून आले. दक्षता पथकाने घटनास्थळी एका व्यक्तीस रंगेहाथ पकडले.

तपासात २० लीटर क्षमतेच्या प्लास्टिक कॅनमध्ये प्लास्टिक पाईप व व्हॉल्वच्या साहाय्याने इंधन काढले जात असल्याचे उघड झाले. पथकाने तपासणी केलेल्या एमएच-०४ केयू-१८२६ या टँकरमध्ये १० हजार लीटर पेट्रोल आणि १४ हजार लीटर डिझेल, तर एमएच-०४ एलवाय-६३८८ या टँकरमध्ये २९ हजार लीटर विमान इंधन (एटीएफ) असल्याचे आढळून आले.कारवाईत जप्त करण्यात आलेल्या पेट्रोल, डिझेल व (एटीएफ) इंधनासह संबंधित टँकर आणि अन्य साहित्य असा एकूण १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई दक्षता पथकातील उपनियंत्रक शिधावाटप गणेश बेल्लाळे, उपनियंत्रक माधुरी शिंदे, मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे, शिधावाटप अधिकारी गणेश पवार, सहायक शिधावाटप अधिकारी योगेश्वर मोरे तसेच शिधावाटप निरीक्षक रामराजे भोसले, चंद्रकांत कांबळे, विकास नागदिवे, राहुल इंगळे आणि अरुण काते यांनी केली.

प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून संबंधितांविरोधात आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून देण्यात आली.

# ठाकरेंच्या ६ फुटीर खासदारांचा गट स्थापन, आता शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होणार!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** - उद्धव ठाकरे यांची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी अखेर दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांना भेटून आपण स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र दिले.


लोकसभा अध्यक्षांनी या स्वतंत्र गटाला मंजूरी दिली असून बंडखोर खासदारांच्या स्वतंत्र गटाच्या स्थापनेची प्रक्रिया दिल्लीत पूर्ण झाली आहे. त्यानंतर हा गट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. काल रात्रीपासून ठाकरे गटाचे फुटीर खासदार एक-एक करुन दिल्लीत दाखल व्हायला सुरुवात झाली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील काल रात्री दिल्लीत दाखल झाले होते. यानंतर ठाकरे गटाच्या बंडखोर खासदारांना अज्ञातस्थळी ठेवण्यात आले होते. काहीवेळापूर्वीच या सहा बंडखोर खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासोबत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची भेट घेऊन आपला स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र सादर केले. लोकसभा अध्यक्षांच्यादेखत बंडखोर आमदारांनी पत्रावर सह्या केल्या. त्यामुळे या खासदारांच्या स्वतंत्र गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिली. पक्षांतरबंदी कायद्यानुसार, स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी आमदार किंवा खासदार संख्येच्या एकूण संख्याबळाच्या दोन तृतीयांश संख्याबळाची गरज असते. ठाकरे गटाचे एकूण नऊ खासदार आहेत. यापैकी सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला आहे. त्यामुळे या गटाला अधिकृत मंजुरी मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु होती. मात्र, दिल्लीतील भाजपश्रेष्ठींना या ऑपरेशनला ग्रीन सिग्नल दिला नव्हता.

अखेर १० जून रोजी दिल्लीत झालेल्या एनडीएच्या बैठकीनंतर अमित शाह यांनी पंतप्रधान मोदींशी बातचीत करुन या ऑपरेशनला ग्रीन सिग्नल दिला.

# ग्रामीण भागात शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी नवे धोरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## दरमहा १५० ते ४०० रुपये पाणीपट्टी आकारणार



**मुंबई** - ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छ, निर्जंतुक आणि शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ ला मंजुरी देण्यात आली.


या धोरणाअंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या जलजीवन मिशन २.० मधील योजनांच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी सर्वंकष आराखडा तयार करण्यात येणार आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या व्हिजन डॉक्युमेंटशी सुसंगत असलेल्या या धोरणातून २०४७ पर्यंत राज्यातील प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला शाश्वत आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

धोरणानुसार अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन टप्प्यांमध्ये नियोजन करण्यात येईल. यामध्ये १०० टक्के आणि समान प्रमाणात शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यावर भर दिला जाणार आहे.

स्वतंत्र नळ पाणीपुरवठा तसेच प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर स्वतंत्र देखभाल निधी आणि कॉर्पस फंड तयार केला जाणार आहे.

# जिल्ह्यात विधान परिषद निवडणुकीची तयारी पूर्ण, ९ ठिकाणी केंद्रे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***मुंबई*** - विधान परिषद निवडणुकीसाठी अवघा १ दिवस शिल्लक राहिला आहे. दरम्यान, नाशिक विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी पूर्ण केली आहे. एका जागेसाठी होणाऱ्या या निवडणुकीचे मतदान गुरुवारी, म्हणजेच उद्या १८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील ६१९ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. नऊ मतदान केंद्रांची व्यवस्था या निवडणुकीसाठी नाशिक जिल्ह्यात एकूण नऊ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून सर्व आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. सोबतच मतदानासाठी जम्बो बॅलेट बॉक्सचीही व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक उपजिल्हाधिकारी मधुमती सरदेसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी सुरू असून अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश मतदानासाठी मतपत्रिकेचा वापर केला जाणार असून मतदारांनी पसंतीक्रमानुसार मतदान करायचे आहे. मतदानानंतर मतमोजणी २२ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात होणार आहे. दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज १६ जून रोजी दुपारी ४ वाजल्यापासून ते मतदान संपेपर्यंत म्हणजेच १८ जून रोजी सायंकाळपर्यंत जिल्ह्यात मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# मंत्री सरनाईक यांची मध्यस्थी... 'ऑपरेशन टायगर' फत्ते

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** - उबाठा गटाचा सहावा खासदार राजी होत नसल्याने 'ऑपरेशन टायगर' रखडल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री उशिरा सर्व चक्रे वेगाने फिरवून अखेर ही मोहीम फत्ते केली. शिंदेंनी ही किमया कशी साधली, याच्या सुरस कथा आता समोर येऊ लागल्या आहेत. उबाठाचे निष्ठावंत खासदार ओमराजे निंबाळकर 'मातोश्री'ची साथ सोडून मध्यरात्री दिल्लीत दाखल झाले आणि 'ऑपरेशन टायगर' पूर्ण झाले. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पडद्यामागून लावलेली तगडी 'फिल्डिंग' आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी पुण्यातून उपलब्ध करून दिलेले विशेष विमान, या दुहेरी रणनीतीमुळे अवघ्या काही तासांत ही प्रक्रिया पूर्ण झाली.

ओमराजे निंबाळकर हे शेवटपर्यंत उद्धव ठाकरेंसोबत राहतील, असा कयास वर्तवला जात होता. मात्र, अत्यंत नाट्यमय आणि गुप्त पद्धतीने राबवण्यात आलेल्या या मोहिमेमुळे उबाठाची तटबंदी पूर्णपणे ढासळली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत ठाकरे गटाच्या प्रत्येक खासदाराची नाडी ओळखण्याची जबाबदारी शिवसेनेतील बड्या नेत्यांवर सोपवण्यात आली होती.



# जी ७ मध्ये पुन्हा रंगली 'मोदी-मेलोनी'ची मैत्री!

## आपण इंस्टाग्रामवर सर्वाधिक प्रसिद्ध

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**फ्रान्स** – फ्रान्समधील एव्हियान येथे पार पडलेल्या ऋ७ शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीने अनेक राजनैतिक घडामोडी घडल्या.

मात्र, या सर्वांमध्ये पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली ती म्हणजे पंतप्रधान मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यातील खास केमिस्ट्री. भेटीदरम्यान मेलोनी यांनी मोदींना हसत-खेळत शुभेच्छा देताना, पुन्हा भेटून आनंद झाला. आपण इंस्टाग्रामवर सर्वात प्रसिद्ध आहोत, असे म्हणत वातावरण हलकेफुलके केले. जी७ परिषदेदरम्यान मोदींनी अनेक जागतिक नेत्यांशी संवाद साधला.

यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ऊेरश्रव Trump यांच्यासोबतची भेट विशेष चर्चेत राहिली. सुमारे पाच मिनिटांच्या या चर्चेत दोन्ही नेत्यांनी विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा केली. परिषदेतील एका सत्रात दोघेही एकत्र बसलेले दिसले. फेब्रुवारी २०२५ मध्ये व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या भेटीनंतर तब्बल १६ महिन्यांनी ही प्रत्यक्ष भेट झाली. भारत-अमेरिका व्यापार करार, शुल्क धोरण, गुंतवणूक आणि सामरिक भागीदारी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर दोन्ही देशांमध्ये चर्चा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी मोदींचे स्वागत केले. परिषदेत सहभागी देशांच्या प्रमुखांचे सामूहिक छायाचित्रही काढण्यात आले.

# फ्रान्समध्ये जी ७ परिषदेला सुरुवात : १६ महिन्यांनी झाली मोदी-ट्रम्प यांची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**एव्हिएन** – भारत आणि अमेरिकेदरम्यान अनेक तणावपूर्ण प्रसंग घडल्यानंतर अखेर १६ महिन्यांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी 'जी-७' शिखर परिषदेत भेट झाली. यावेळी दोघांनी एकमेकांची विचारपूस केली आणि संवाद साधला. फ्रान्समधील एव्हिएन-ले-बॅन्स या शहरात दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे दीड वर्षांनंतर झालेली ही पहिली प्रत्यक्ष भेट होती.



मोदी आणि ट्रम्प यांनी एकमेकांशी हस्तांदोलन केले आणि त्यानंतर त्यांच्यात संक्षिप्त चर्चा झाली. दोन्ही नेत्यांमध्ये बुधवारी शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर द्विपक्षीय बैठक होणार आहे. या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.गेल्या महिन्यात अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांच्या भारत दौऱ्यानंतर, दोन्ही देश द्विपक्षीय संबंधांची नव्याने उभारणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. तथापि, गेल्या आठवड्यात ओमानच्या किनारपट्टीवर एका व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्यानंतर दोन्ही देशांमध्ये पुन्हा तणाव निर्माण झाला आहे.

इराणने अण्वस्त्र बनवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा सर्वनाश – ट्रम्प इराणने अण्वस्त्र मिळवण्याचा प्रयत्न केला, तर त्यांचा सर्वनाश होईल, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

# अमरावतीच्या कुमकुम मोहोडचा जागतिक धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णवेध

## मिक्स्ड टीम प्रकारात भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – तुर्की येथील अंतालिया येथे ९ ते १४ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-३' (धनुर्विद्या विश्वचषक) स्पर्धेत भारतीय संघाने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. अमरावतीच्या खेलो इंडिया केंद्राची प्रशिक्षणार्थी कुमकुम मोहोड हिने भारतीय संघातील धीरज बोम्मादेवरा राय याच्यासह मिक्स्ड टीम (मिश्र संघ) प्रकारात अंतिम सामन्यात




दक्षिण कोरियाचा ५-१ अशा सेट फरकाने पराभव करून भारताला हे ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून दिले आहे.

अमरावती येथील खेलो इंडिया धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्रात मागील आठ वर्षांपासून राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करणाऱ्या कुमकुमच्या या सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय यशामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचा गौरव वाढला आहे. तसेच यापूर्वीही चीन येथे झालेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत तिने भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. कुमकुमच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे.

उपसंचालक तथा जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर आणि अध्यक्ष ॲड.प्रशांत देशपांडे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

कुमकुमची सध्याची प्रगती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सातत्य पाहता ती आगामी स्पर्धांमध्येही भारताला आणखी पदके मिळवून देईल, असा विश्वास तिचे प्रशिक्षक प्रफुल डांगे यांनी व्यक्त केला असून कुमकुम आता जुलै २०२६ मध्ये स्पेन येथे होणाऱ्या 'वर्ल्ड कप स्टेज-४' आणि जपान येथे होणाऱ्या '२० व्या आशियाई क्रीडा' स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मर्जीतील समजले जाणारे सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची मंगळवारी बदली करण्यात आली.

सिंघल यांच्या जागी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने काही सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ.अश्विनी जोशी




यांची बदली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त या नवनिर्मित पदावर झाली आहे. तर डॉ.जोशी यांच्या जागी प्राजक्ता वर्मा यांची वर्णी लागली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांची नेमणूक करण्यात आली आहे.

तर उद्योग विकास आयुक्त म्हणून डॉ.कादंबरी बलकवडे यांची नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र माहिती आणि तंत्रज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांची बदली आयुक्त आणि संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान या पदावर करण्यात आली आहे.

# धर्मगुरूसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्याच्या तक्रारीनंतर कोंढवा पोलिसांची कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – प्रार्थनेच्या माध्यमातून कर्करोग आणि ट्यूमरसारखे असाध्य आजार बरे करण्याचा खोटा दावा करणाऱ्या एका धर्मगुरूसह आठ जणांविरुद्ध पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा परिसरातील एका प्रार्थनास्थळात अंधश्रद्धा पसरवण्याचा हा धक्कादायक प्रकार




उघडकीस आला असून याप्रकरणी एका ३२ वर्षीय महिला कार्यकर्त्याने तक्रार दिली आहे. प्रार्थनेच्या माध्यमातून कर्करोग आणि ट्यूमरसारखे असाध्य आजार बरे करण्याचा खोटा दावा करणाऱ्या एका धर्मगुरूसह आठ जणांविरुद्ध पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा परिसरातील एका प्रार्थनास्थळात अंधश्रद्धा पसरवण्याचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी एका ३२ वर्षीय महिला कार्यकर्त्याने तक्रार दिली आहे. पास्टर केनेथ पॉल सिल्वे आणि त्याच्या सात ते आठ कार्यकर्त्यांवर जादुटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार कोंढवा पो-लीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रशांत मंडले या प्रकरणाचा तपास करत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत सक्रिय असलेल्या तक्रारदार महिला रविवारी त्यांच्या एका मैत्रिणीसह या प्रार्थनास्थळात गेल्या होत्या. तेथे उपस्थित स्वयंसेवकांनी त्यांच्याकडून वीस रुपये घेऊन त्यांना प्लास्टिकच्या बाटलीत पाणी दिले, तसेच हे पाणी आजारी भागावर लावल्यास आजार बरा होईल असे सांगितले. त्यानंतर झालेल्या सभेत मुख्य धर्मगुरू केनेथ सिल्वे याने उपस्थितांना मार्गदर्शन करताना, शरीराच्या आजारी भागावर उजवा हात ठेवण्यास सांगून देव कर्करोग व ट्यूमर बरे करेल असा दावा केला. या संपूर्ण प्रकाराचे फिर्यादी आणि त्यांच्या मैत्रिणीने मोबाईलवर चित्रीकरण सुरू केले असता तेथील महिला स्वयंसेवकांनी त्यांना तीव्र विरोध केला. आरोपींनी दोघींना धक्काबुक्की करत त्यांच्या मोबाईलमधील चित्रीकरण बळजबरीने डिलीट केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा कसून तपास सुरू आहे.

## युवा मित्र मंडळ पुसला तर्फे

# नवनियुक्त ठाणेदार राहुल गवई यांचे स्वागत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शे.घाट पोलिस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार राहुल गवई यांचे युवा मित्र मंडळ पुसला तर्फे स्वागत करण्यात आले.

काही दिवसाआधी शें.घाट पोलिस स्टेशन येथील ठाणेदार दिपक महाडिक यांची प्रशासकीय बदली अकोल्या जिल्हयातील मुर्तीजापुर ग्रामीण येथे करण्यात आली.

तेव्हा मोर्शी पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक राहुल गवई यांची बदली होऊन त्यांनी शे.घाट पोलिस स्टेशनचे



ठाणेदार म्हणुन पदभार स्विकारला.

त्यांच्या नियुक्तीमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबुत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तेव्हा त्यांच्या या नवीन प्रवासाला युवा मित्र मंडळ पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, सहसचिव धिरज सावरकर, प्रमोद पाटील, अमर इवनाते, शुभम वडस्कर, विलास मरकाम, उमेश सिनकर आदींनी शुभेच्छा देऊन स्वागत केले.

# 'पोक्सो' कायद्यांतर्गत आरोपीला जामीन मंजूर

## आरोपीच्या वतीने ॲड.विनोद भोसे यांचेसह इतरांनी मांडली बाजु

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश न्यायालयाने 'पोक्सो' कायद्याअंतर्गत आरोपीचा जमीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड.विनोद भोसे यांचेसह इतरांनी बाजु मांडली.

आरोपी सतीश नामदेवराव तायवाडे याचे विरुद्ध वरुड पोलीस स्टेशन यांनी भारतीय न्याय संहिता कलम ७५(२), ३५१(३), पोक्सो कलम ८ कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून त्याची न्यायालयीन कोठडी मंजूर केलेली होती. त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड. विनोद भोसे यांनी फौजदारी जमीन अर्ज न्यायालयात दाखल केला. त्यावेळी न्यायालयाने आरोपीला जामीन का देण्यात येऊ नये म्हणुन



पोलीस स्टेशन अधिकारी यांना नोटीस जारी केले. फिर्यादीने आरोपी विरुद्ध असा आरोप केलेला होता की, तिच्या मुलीचे वय १० वर्ष १० महिने असे आहे व तिचे सोबत आरोपीने अश्लील असे वर्तन केले व त्यामुळे तिने पोलीस स्टेशन वरूड येथे तक्रार नोंदविली. यावेळी सरकारी पक्षाने आरोपीच्या जामिनाला तीव्र विरोध केला आरोपीकडून अशाच प्रकारची प्रवृत्ती भविष्यात होऊ शकते, आरोपी विरुद्ध अगोदरही गुन्हेगारी स्वरुपाचे तपशील आहेत, त्यामुळे आरोपीचा जामीन नाकारण्यात यावा. त्यावेळी आरोपीचे वकील ॲड.विनोद भोसे यांनी असा युक्तिवाद केला की, पोलिसांचा तपास हा जवळपास संपलेला आहे, त्याचप्रमाणे पिडीतेचे आईसोबत आरोपीचे ओळख परिचय होता. आरोपी हा वेळोवेळी आर्थिक परिस्थितीमध्ये पीडितेच्या आईला मदत करीत असे परंतु ज्यावेळी १२ हजार रुपये रोखची मागणी केली त्यावेळी सदरची रक्कम पीडितेच्या आईला देऊ शकला नाही त्यामुळे बेकायदेशीरपणे आरोपीला उपरोक्त कलम नुसार फसवण्यात आलेले आहे, आरोपी विरुद्ध या अगोदरचे जरी फौजदारी स्वरुपाचे तपशील असले तरीही आरोपी हा निर्दोष आहे, कारण कोणत्याही न्यायालयाने त्याला अजून पर्यंत शिक्षा सुनावलेली नाही म्हणुन तो प्रथमदर्शनी निर्दोष मानला जाईल. न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून सर्व मुद्दे पुराव्या अंतिम ठरवल्या जाईल पण प्रथम दर्शनी आरोपीला जामीन देण्यास कुठल्याही प्रकारची हरकत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. आरोपीचा जामीन मंजूर केला त्यावेळी शर्ती व अटी आरोपीवर लादण्यात आल्यात. आरोपीने शर्ती व अटीचे उल्लंघन केल्यास आरोपीची जमानत रद्द होण्यास पात्र राहील, असे न्यायालयाने निर्देश दिले.

सदर खटला व न्यायालयीन कामकाजात ॲड.शांतीभुषण छांगाणी, ॲड.दिनेश सदापुरे, ॲड.वर्षा बोपचे (भोसे), ॲड.निलेश ठाकरे, ॲड.पवन वाडीवे, ॲड.पी.एस.कोल्हारे यांनी देखील सहकार्य केले.

## संपादकीय

**अडचण म्हणजे संधी असते, काहीतरी नवीन शिकण्याची.**


### 'खेला होबे' ते लोकशाहीची परीक्षा: बंगालच्या राजकीय संघर्षाचा नवा अंक

'खेला होबे' (खेळ होणार) हा केवळ दोन शब्दांचा एक राजकीय घोष नाही, तर तो पश्चिम बंगालच्या रक्तरंजित आणि धगधगत्या राजकीय संघर्षाचे प्रतीक आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने भारतीय जनता पक्षाविरुद्ध पुकारलेली ही एक युद्धगर्जना होती. त्या काळात या घोषाने बंगालच्या गल्लीबोळांतून राजकीय अस्मितेची आणि सत्तेच्या संघर्षाची ठिणगी पेटवली. परंतु, काळाच्या ओघात आणि बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये आज हाच 'खेला होबे' हा घोष एका वेगळ्या, अधिक चिंताजनक अर्थाने ऐकू येत आहे. आज बंगालमधील संघर्ष हा केवळ तृणमूल काँग्रेस विरुद्ध भाजप किंवा ममता बॅनर्जी विरुद्ध नरेंद्र मोदी असा मर्यादित राहिलेला नाही. तो त्याहून पुढे जाऊन भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांची, तिच्या संस्थांची आणि घटनात्मक चौकटीची परीक्षा घेणारा ठरत आहे. 'खेला होबे'चा उगम आणि बदललेले स्वरूप पश्चिम बंगालच्या राजकारणाचा इतिहास हा वैचारिक निष्ठा आणि तितक्याच तीव्र हिंसेने माखलेला आहे. डाव्यांची ३४ वर्षांची सत्ता उलथवून लावताना ममता बॅनर्जी यांनी 'परिवर्तन'चा नारा दिला होता. मात्र, त्यानंतरच्या दशकात बंगालच्या राजकारणाचे चित्र बदलले आणि तिथे भाजपचा आक्रमक प्रवेश झाला. या पार्श्वभूमीवर २०२१ मध्ये 'खेला होबे' हा नारा जन्माला आला. सुरुवातीला हा नारा सत्ता टिकवण्याच्या आणि मिळवण्याच्या ईर्षेतून निर्माण झाला होता. परंतु, आज या घोषाचा अर्थ बदलला आहे. आजचा 'खेला' हा निव्वळ निवडणुका जिंकण्यापुरता मर्यादित नाही, तर तो: विरोधी पक्षांना नामोहरम करणे, सरकारी यंत्रणांचा राजकीय फायद्यासाठी वापर करणे, आणि स्थानिक पातळीवर दहशतीचे साम्राज्य निर्माण करणे, या स्वरूपात समोर येत आहे. हा बदललेला अर्थ बंगालच्याच नव्हे, तर देशाच्या लोकशाहीसाठी एक धोक्याची घंटा आहे. केवळ दोन पक्षांतील संघर्ष नाही वरवर पाहता बंगालमधील राजकीय चित्र हे तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातील थेट सामना असे दिसते. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर होणारे आरोप-प्रत्यारोप, नेत्यांची पक्षांतरे आणि जाहीर सभांमधील टोकाची टीका यामुळे हे दोनच पक्ष केंद्रस्थानी असल्याचे भासते. पण खोलात जाऊन पाहिले तर हा संघर्ष केवळ सत्ता हस्तगत करण्याचा नाही. हा संघर्ष आहे दोन वेगवेगळ्या राजकीय विचारसरणींमधील टोकाच्या ध्रुवीकरणाचा. एका बाजूला प्रादेशिक अस्मिता आणि लोककल्याणकारी योजनांच्या बळावर सत्ता टिकवू पाहणारी तृणमूल काँग्रेस आहे, तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि केंद्रातील सत्तेच्या जोरावर बंगाल काबीज करू पाहणारा भाजप आहे. या दोन विचारसरणींच्या चकमकीत बंगालची जनता आणि तिथली शांतता होरपळून निघत आहे. भारतीय लोकशाहीच्या मूल्यांची परीक्षा बंगालमधील सद्यस्थिती ही भारतीय लोकशाहीच्या काही अत्यंत महत्त्वाच्या मूल्यांची परीक्षा घेत आहे.

# भ्रष्टाचाऱ्यांचे धाबे दणाणणार, माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याकडे लोकायुक्तची मोठी जबाबदारी

राज्यातील प्रशासकीय आणि राजकीय व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने एका अत्यंत महत्त्वाच्या न्यायिक संस्थेला आता खऱ्या अर्थाने बळ मिळाले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेला एक अत्यंत संवेदनशील आणि कळीचा मुद्दा अखेर मार्गी लागला आहे. महाराष्ट्र राज्याच्या प्रशासकीय वतुर्ळात अत्यंत शिस्तबद्ध अधिकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, तसेच राज्याच्या माजी पोलीस महासंचालक असलेल्या रश्मी शुक्ला यांच्यावर आता एका नव्या आणि अत्यंत महत्त्वपूर्ण पदाची धुरा सोपवण्यात आली आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या लोकायुक्त या सर्वोच्च न्यायिक संस्थेच्या सदस्यपदी त्यांची अधिकृतरीत्या नियुक्ती करण्यात आली आहे.



केवळ रश्मी शुक्ला याच नाही, तर त्यांच्यासोबत ओपी गुप्ता आणि सुवर्णा केवले या दोन अनुभवी प्रशासकीय दिग्गजांचीही लोकायुक्त सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयावर एका विशेष उच्चस्तरीय बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. या अतिमहत्त्वाच्या बैठकीला राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधान परिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते अनिल परब उपस्थित होते. या सर्व उच्चपदस्थ मान्यवरांच्या एकमताने आणि सहमतीने या तीनही नावांना अंतिम मंजुरी देण्यात आली. त्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेल्या या नियुक्त्यांचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला असून, राज्य सरकारच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे प्रशासनावरील वचक आणि भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणारी यंत्रणा अधिक भक्कम झाली आहे.

सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार समूळ नष्ट व्हावा आणि सामान्य जनतेला स्वच्छ आणि पारदर्शक प्रशासन मिळावे, या उदात्त हेतूने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अनेक वर्षे प्रदीर्घ असा लढा दिला होता.

त्यांच्या या व्यापक जनआंदोलनाला यश येऊन राज्यामध्ये लोकायुक्त कायदा लागू करत एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले होते. विशेष म्हणजे, वर्ष २०२४ मध्ये राज्याच्या प्रमुख लोकायुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली होती. असे असले तरी, संस्थेचे इतर महत्त्वपूर्ण सदस्य आणि संलग्न पदे रिक्त असल्यामुळे या न्यायिक संस्थेचे कामकाज पूर्ण क्षमतेने चालण्यात अनेक प्रशासकीय व तांत्रिक अडचणी येत होत्या. आता मात्र या सर्व नव्या नियुक्त्यांमुळे संस्थेची अंतर्गत रचना अधिक भक्कम आणि कार्यक्षम होणार आहे.

नव्या जबाबदारीमुळे आता अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींवर रश्मी शुक्ला यांची अत्यंत करडी नजर राहणार आहे. लोकायुक्त ही अशी एक स्वायत्त आणि शक्तिशाली संस्था आहे, जिचे मुख्य काम सार्वजनिक पदांवर बसलेल्या व्यक्तींच्या कारभारावर बारीक लक्ष ठेवणे आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींची अत्यंत सखोल चौकशी करणे हे आहे. सर्वांत महत्त्वाची आणि उल्लेखनीय बाब म्हणजे, राज्याच्या विद्यमान कायद्यानुसार साक्षात राज्याचे मुख्यमंत्री हे सर्वोच्च पददेखील या संस्थेच्या चौकशीच्या कक्षेत येते.

गरज पडल्यास मुख्यमंत्र्यांविरोधातील तक्रारींची सत्यता पडताळण्याचे आणि चौकशी करण्याचे मोठे अधिकार या संस्थेला देण्यात आले आहेत. पोलीस महासंचालक म्हणून काम करताना असलेल्या दांडग्या अनुभवाचा फायदा रश्मी शुक्ला यांना नक्कीच होईल. त्यांच्यासोबत इतर सदस्यांच्या सहभागामुळे राज्यातील भ्रष्ट प्रवृत्तींना मोठा आळा बसेल आणि प्रशासकीय कामकाजाला एक नवी गती मिळेल, असा ठाम विश्वास प्रशासकीय वतुर्ळातून व्यक्त केला जात आहे.

# पंढरीच्या वारीत भेटलेला खरा विठ्ठल : इरफान मुजावर

पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या यात्रेकरूंवर सोलापूर जिल्ह्यातील माळिशरस तालुक्यात असलेल्या तांदुळवाडी येथे काळाने घाला घातला.

यात्रेकरूंनी भरलेले वाहन पाण्याने तुडुंब भरलेल्या विहिरीत कोसळले आणि क्षणार्धात या आनंदयात्रेचे रूपांतर आक्रोशात झाले. या भीषण दुर्घटनेत १४ निरपराध भाविकांचा मृत्यू झाला. अनेक कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला.

मात्र अशा काळ्याकुट्ट क्षणी एक माणूस आशेचा किरण बनून उभा राहिला आणि त्याचे नाव होते इरफान मुजावर!

अपघात झाला, तेव्हा ते तेथूनच मोटारसायलवरून जात होते. अपघात होताच त्यांनी कोणत्याही आदेशाची, कोणत्याही मदतीची वाट न पाहता स्वतःच्या जीवाची पर्वा न करता थेट विहिरीत उडी घेतली. मृत्यूशी झुंज देणाऱ्या यात्रेकरूंना वाचवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. त्यांच्या धाडसामुळे एका चार वर्षांच्या चिमुकल्यासह चार जणांचे प्राण वाचले.

आज समाजात धर्म, जात, पंथ, भाषा यांच्या नावाने भिंती उभ्या केल्या जात आहेत. द्वेषाचे राजकारण करून माणसाला माणसापासून दूर नेण्याचा प्रयत्न होत आहे, पण तांदुळवाडीच्या त्या विहिरीत इरफान मुजावर यांनी दाखवून दिले, की संकटात



माणसाचा धर्म एकच असतो आणि तो म्हणजे मानवता!

बुडणाऱ्या यात्रेकरूंचे प्राण वाचवतांना त्यांनी त्यांचा धर्म विचारला नाही, जात विचारली नाही, नाव विचारले नाही. त्यांनी फक्त एवढेच पाहिले, की काही जीव मदतीसाठी हाक मारत आहेत आणि ते करून दृश्य पाहून ते धावून गेले.

आपल्या समाजाला आज अशाच माणसांची गरज आहे. मंदिर, मशिद, चर्च किंवा गुरुद्वारा यांपेक्षा मोठे जर काही असेल, तर ते म्हणजे दुसऱ्याचा जीव वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालण्याची वृत्ती. इरफान मुजावर यांनी ही बाब कृतीतून सिद्ध करून दाखवली.

तांदुळवाडी दुर्घटनेतील या निष्पाप मृतांना भावपूर्ण आदरांजली! आणि मानवतेचा झेंडा उंच फडकवणाऱ्या इरफान मुजावर यांना मानाचा मुजरा..! मित्रांनो, जगद्गुरु तुकोबाराय यांचा एक अभंग आहे.. जे का रंजले गांजले श्र त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा याचा अर्थ इतकाच. की देव मंदिरातील दगडात वास करत नाही;

तर इरफान मुजावर यांच्यासारख्या मानवतावादी आणि धाडसी व्यक्तींच्या रूपात वावरत असतो. संत गाडगेबाबा म्हणतात, 'मंदिरात देव राहत नाही, तर भटाचे पोट राहते. खरा देव तर समाजातील सद्गुणी माणसात राहतो', तेव्हा या मानवतारूपी जनता जनार्धनाला ओळखायला शिका.. त्याचे स्तवन करा..

मानव समाजाचे उत्थान करण्यासाठी तेच आवश्यक आहे.

जय भारत..!

**बाळासाहेब गरुड**

# वेगाने झेप घेणारा आधुनिक भारत: प्रगतीचा नवा अध्याय

आजचा भारत हा जगातील सर्वात तरुण आणि वेगाने विकसित होणारा देश म्हणून उदयास येत आहे. तंत्रज्ञान, जागतिक राजकारण आणि आर्थिक सुधारणांच्या बळावर भारताने जागतिक पटलावर आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. पारंपारिक चौकटीतून बाहेर पडत भारताने अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा या चार महत्त्वाच्या स्तंभांवर एकाच वेळी लक्ष केंद्रित केले असून, विकासाचा हा नवा वेग देशाचे चित्र बदलून टाकत आहे.



१. अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक घोडदौड भारत आज जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला असून, लवकरच तिसऱ्या स्थानावर पोहोचण्याचा मानस आहे. डिजिटल क्रांती आणि स्टार्टअप इकोसिस्टममुळे देशात व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या धोरणांमुळे देशांतर्गत उत्पादनाला गती मिळाली आहे. आज भारत केवळ वस्तूंचा आयातदार राहिलेला नाही, तर मोबाईल, संरक्षण साहित्य आणि सॉफ्टवेअरचा मोठा निर्यातदार बनत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला मुख्य प्रवाहाशी जोडल्यामुळे आर्थिक विकासाचा पाया अधिक मजबूत झाला आहे.

२. सामाजिक सुरक्षेचे कवच आर्थिक प्रगतीसोबतच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचे फळ पोहोचवण्यासाठी भारताने सामाजिक सुरक्षेचे जाळे विस्तारले आहे.

आयुष्मान भारत योजना: या जगातील सर्वात मोठ्या आरोग्य विमा योजनेमुळे कोट्यवधी गरीब कुटुंबांना मोफत उपचारांची हमी मिळाली आहे.

पीएम किसान सन्मान निधी व अन्न सुरक्षा: शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत आणि गरिबांना मोफत अन्नधान्य पुरवून सरकारने सामाजिक स्थैर्य राखले आहे.

महिला सक्षमीकरण: उज्ज्वला योजना, मुद्रा लोन आणि जनधन खात्यांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवले गेले आहे, ज्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत आहेत.

३. ऊर्जा क्षेत्रातील स्वावलंबन पारंपारिक ऊर्जेवरची निर्भरता कमी करत भारताने 'हरित ऊर्जा' क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती केली आहे. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे नेतृत्व करत भारताने सौर आणि पवन ऊर्जेची क्षमता झपाट्याने वाढवली आहे. आज देशात राष्ट्रीय हायड्रोजन मिशन आणि इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे. २०७० पर्यंत 'नेट झिरो' उत्सर्जनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून भारत शाश्वत विकासाकडे पावले टाकत आहे, ज्यामुळे पर्यावरण रक्षण आणि ऊर्जा सुरक्षा दोन्ही साध्य होत आहे.

४. पायाभूत सुविधांचा कायापालट भारतातील पायाभूत सुविधांचा विकास सध्या डोळे दिपवणारा आहे. 'गतिशक्ती' मास्टरप्लॅन अंतर्गत रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक आणि जलमार्गांचे जाळे जोडले जात आहे.

# दक्षिण महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा

सांगली जिल्हा, जो सहकार चळवळ आणि कृषी समृद्धीसाठी ओळखला जात होता, तो सध्या वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे चर्चेत आहे. खून, टोळी संघर्ष आणि संघटित गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.




एकेकाळी साखर कारखाने, सहकार चळवळ, कृषी समृद्धी आणि शांत सामाजिक वातावरणासाठी ओळखला जाणारा सांगली जिल्हा सध्या वाढत्या गुन्हेगारीमुळे चर्चेत आला आहे. गेल्या काही महिन्यांत घडलेल्या खून, टोळी संघर्ष, घरफोड्या, अवैध व्यवसाय आणि संघटित गुन्हेगारीच्या घटनांमुळे केवळ सांगलीकरच नव्हे, तर संपूर्ण दक्षिण महाराष्ट्रातील नागरिकांमध्येही चिंता वाढली आहे. अलीकडेच अभयनगर परिसरात घडलेल्या वेदांत बंडगर हत्याकांडाने राज्यभरात खळबळ उडाली. पाच जणांच्या टोळीने घरात घुसून अवघ्या १४ वर्षीय मुलाची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. प्राथमिक तपासात हल्लेखोरांचे लक्ष्य कुटुंबातील अन्य व्यक्ती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे गुन्हेगारांचे वाढते धाडस आणि कायद्याच्या भीतीत झालेली घट यावर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

याआधीही सांगली शहर आणि परिसरात खून, टोळी संघर्ष आणि वर्चस्वासाठी होणाऱ्या लढाया सातत्याने समोर येत आहेत. काही महिन्यांपूर्वी विश्रामबाग परिसरात एका युवकाचा खून करून त्याचा मृतदेह विहिरीत टाकल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणात अल्पवयीन मुलांचा सहभाग असल्याचे तपासात समोर आले, ज्यामुळे युवकांमधील वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती आणि सामाजिक चिंतेत भर पडल्याचे स्पष्ट झाले आहे.घर्ष आणि संघटित

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# राजधानीत दहशतवादी कट उधळला!

* आयएसआय समर्थित नेटवर्कचा दिल्लीत
* पर्दाफाश शस्त्रे-ड्रग्ज तस्करीप्रकरणी ७ जेरबंद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांच्या सावटाखाली आल्याचे समोर आले आहे.

पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय समर्थित असल्याचा संशय असलेल्या एका मोठ्या नेटवर्कचा दिल्ली पोलिसांनी पर्दाफाश केला असून शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या ईस्टर्न रेंज पथकाने ही मोठी कारवाई करत संभाव्य दहशतवादी कट हाणून पाडला.

प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेल्या आरोपींचे संबंध पाकिस्तानातील कुख्यात गँगस्टर ते दहशतवादी बनलेल्या शहजाद भट्टी आणि त्याचा सहकारी अजमल गुजर यांच्या नेटवर्कशी असल्याचे उघड झाले आहे. हे नेटवर्क केवळ अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी करत नव्हते, तर दिल्ली-एनसीआर परिसरात दहशतवादी कारवायांसाठी आवश्यक माहिती गोळा करणे आणि संभाव्य लक्ष्यांवर पाळत ठेवण्याचे कामही करत असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

# कोकण रेल्वेची परदेशभरारी

## दुबई, अर्जेंटिना, इस्रायलमध्ये रेल्वेप्रकल्प राबवणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – सार्वजनिक क्षेत्रातील कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपला ठसा उमटवण्यासाठी सज्ज झाली आहे. कोकण रेल्वे आता दुबई मेट्रो, अर्जेंटिना आणि इस्रायलमधील प्रमुख पायाभूत सुविधा आणि रेल्वे प्रकल्पांसाठी बोली लावण्याच्या तयारीत आहे. नेपाळमधील काठमांडू-रक्सौल रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासह परदेशातील वाढत्या अनुभवाच्या जोरावर 'कोकण रेल्वे'ने आपल्या जागतिक महत्त्वाकांक्षांचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे. आव्हानात्मक भूप्रदेशात जटिल रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचा अनेक दशकांचा अनुभव असलेल्या 'कोकण रेल्वे'चे उद्दिष्ट आता भारताबाहेर आपल्या तांत्रिक क्षमतांचा लाभ उठवण्याचे आहे.

# कोट्यावधींच्या कर्जातून सुटण्यासाठी हिरे व्यापाऱ्याचा मृत्यूचा बनाव

## २ चपलांनी फोडले बिंग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – तब्बल १६ कोटी रुपयांच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या एका हिरे व्यापाऱ्याने कर्जदारांपासून सुटका मिळवण्यासाठी स्वतःच्या आत्महत्येचा बनाव रचल्याची धक्कादायक घटना पुण्यात उघडकीस आली आहे.

खडकवासला धरणाच्या काठावर मोबाईल आणि झालेल्या व्यापाऱ्याचा हा डाव अखेर पोलिसांनी उधळून लावला. विशेष म्हणजे, घटनास्थळी वेगवेगळ्या ठिकाणी सापडलेल्या दोन चपलांमुळे या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित हिरे व्यापारी अचानक बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला असता व्यापाऱ्याच्या मोबाईलचे शेवटचे लोकेशन खडकवासला धरण परिसरात आढळले.

पोलिसांनी घटनास्थळी शोध घेतला असता धरणाच्या काठावर एक पिशवी सापडली. त्यामध्ये व्यापाऱ्याचा मोबाईल आणि आत्महत्येची चिठ्ठी होती. सुरुवातीला हा आत्महत्येचा प्रकार असल्याचे वाटत होते. मात्र, घटनास्थळी पाहणी करताना पोलिसांना संशयास्पद बाब आढळली.

# भीषण बस अपघात : ट्रकला धडकून ५ प्रवाशांचा मृत्यू, अनेक जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वडोदरा** – गुजरातमधील वडोदरा-जारोड महामार्गावर आज पहाटे झालेल्या भीषण अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. कोटंबी गावाजवळ एका आलिशान बसने समोरून जाणाऱ्या ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, अपघात इतका भीषण होता की बसचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. धडकेनंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला आणि परिसर प्रवाशांच्या किंकाळ्यांनी दुमदुमून गेला. घटनेची माहिती मिळताच जारोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघाताचे गांभीर्य लक्षात घेऊन बचाव कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकालाही तातडीने पाचारण करण्यात आले. बचाव पथकाने जखमी प्रवाशांना बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयात डॉक्टरांचे विशेष पथक जखमींवर उपचार करत आहे. या अपघातात पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू असून त्यांच्या कुटुंबीयांना माहिती देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी मृतदेह शवागारात हलवून पंचनामा केला असून अपघाताची नोंद घेण्यात आली आहे. बसचालकाला झोप अथवा चक्कर आल्याने अपघात झाला की ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात हा प्रकार घडला, याचा तपास पोलीस करत आहेत. या भीषण दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पुढील तपास सुरू आहे.

# महिला बचत गटांना देणार अडीच एकर जमीन

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

## पडीक जमिनी वापरखाली आणण्यासाठी निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. सरकारच्या निश्चित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र महिला बचत गटांना व्यवसाय आणि शेतीसाठी सरकारकडून तब्बल एक हेक्टर म्हणजेच अडीच एकर जमीन देण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी केली आहे. सरकारच्या या धोरणामुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काची रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असून, महसूल विभागाच्या ताब्यातील हजारो हेक्टर पडीक जमिनींचा प्रश्नही निकाली निघणार आहे. या जमिनींवर उत्पादक उपक्रम सुरू करण्यासाठी सरकारकडून १ लाख रुपयांचे आर्थिक अनुदानही दिले जाणार आहे. ग्रामीण अर्थकारणाला नवी गती देणाऱ्या या योजनेमुळे महिला बचत गटांचे उत्पन्न वाढवण्यासोबतच शासकीय मालमत्तांचे रक्षण करण्याचे दुहेरी उद्दिष्ट सरकारने डोळ्यांसमोर ठेवले आहे. शासनाच्या या नव्या धोरणानुसार, मोकळी जमीन मिळण्यासोबतच महिला बचत गटांना किंवा महिला सहकारी संस्थांना व्यवसाय उभा करण्यासाठी १ लाख रुपयांचे अनुदान दिले जाईल. या आर्थिक मदतीसाठी जिल्हा नियोजन समिती किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या निधीचा प्रामुख्याने वापर केला जाईल. विशेष म्हणजे, ही जमीन महिला बचत गटांना कायमस्वरूपी मालकी हक्काने दिली जाणार नसून, ती पाच वर्षांच्या लीजवर (भाडेपट्टयाने) उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# शरद पवारांकडून स्वपक्षातील खासदारांशी संपर्क सुरू : 'उबाठा' फुटीमुळे सतर्कता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – उबाठाच्या ६ खासदारांनी पुकारलेल्या बंडामुळे महाविकास आघाडीच्या गोटात प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

या फुटीचे पडसाद आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातही उमटू लागले असून, संभाव्य दगाफटका टाळण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार कमालीचे सतर्क झाले आहेत. उबाठातील भूकंपानंतर शरद पवार गटाने आपल्या सर्व ८ लोकसभा खासदारांशी वैयक्तिक संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. कोणत्याही खासदाराची नाराजी पक्षाला महागात पडू नये, यासाठी पुढील एक-दोन दिवसांत पक्षाच्या संसदीय दलाची तातडीची बैठक दिल्लीत बोलावली जाणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. ठाकरे गटाचे जे ६ खासदार स्वतंत्र गट स्थापन करून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत, त्यांच्या नाराजीचे मुख्य कारण पक्षप्रमुखांची न मिळणारी भेट आणि मतदारसंघातील कामांकडे होणारे दुर्लक्ष हेच होते.

उद्धव ठाकरे यांना आपले ९ खासदार एकसंध ठेवण्यात आलेले अपयश पाहता, शरद पवारांनी तातडीने पावले उचलली आहेत. खासदारांच्या मनात कोणतीही धुसफूस किंवा तक्रारी असल्यास त्या ऐकून घेण्यासाठी आणि त्यांचे वेळीच निवारण करण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे. शरद पवार गटाच्या या अस्वस्थतेमागे गेल्या काही महिन्यांत बदललेली राजकीय गणिते कारणीभूत आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाने उत्तम कामगिरी करत ८ खासदार निवडून आणले होते.

# रश्मी शुक्लांकडे नवी जबाबदारी, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या व्यवहारांवर राहणार करडी नजर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्राच्या माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यावर नव्या जबाबदारीची धुरा सोपवण्यात आली आहे. त्यांची राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली असून ओ.पी. गुप्ता आणि सुवर्णा केवले यांचीही लोकायुक्त सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. राज्यातील सर्वोच्च घटनात्मक पदांवरील मान्यवरांच्या बैठकीत या तिन्ही नियुक्त्यांना अंतिम मंजुरी देण्यात आली. राज्यातील लोकायुक्त संस्थेचे कामकाज अधिक प्रभावी आणि सक्षम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधान परिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष तसेच विरोधी पक्षाचे प्रतिनिधी अनिल परब यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# सीजेपी निवडणूक लढवणार नसल्याचे दीपके यांचे संकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – 'कॉकरोच जनता पार्टी'चे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांनी मंगळवारी त्यांची संघटना निवडणूक लढवण्यास उत्सुक नसल्याचे संकेत दिले. तसेच, 'नीट-यूजी' गोंधळाच्या पार्श्वभूमीवर देशातील विद्यार्थ्यांशी संपर्क न साधल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कडाडून टीकाही केली. दरम्यान, आपल्यावर सोमवारी झालेल्या हल्ल्यामागे 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'चे (आरएसएस) काही लोक असल्याचा खळबळजनक आरोपही त्यांनी केला.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी 'सीजेपी'तर्फे नागपूर शहरात आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत दीपके बोलत होते. 'सीजेपी' निवडणूक लढवणार का, असे विचारले असता दीपके म्हणाले, आम्ही निवडणूक का लढवावी, म्हणजे, या देशातील प्रत्येकाला आपले हक्क मागण्यासाठी निवडणूकच लढवावी लागली, तर हे कसे चालेल, असे ते म्हणाले.

मोदींनी माफी मागावी पंतप्रधानांनी देशातील तरुणांना संबोधित करून यापुढे पेपरफुटी होणार नाही, अशी ग्वाही द्यायला हवी का, या प्रश्नावर दीपके म्हणाले की, पंतप्रधानांनी सर्वप्रथम आत्महत्या केलेल्या पाच ते सहा विद्यार्थ्यांच्या पालकांची माफी मागितली पाहिजे. जगात कुठेही काहीही घडले तरी पंतप्रधान तातडीने ट्विट करतात. मात्र, इथे देशातील विद्यार्थी आत्महत्या करत आहेत आणि पंतप्रधानांकडून त्यांच्यासाठी साधे एक शोक ट्विटही केले जात नाही.

आंदोलन सुरूच राहणार तुम्ही किती काळ फक्त स्वतःच्या 'मन की बात' आणि 'परीक्षा पे चर्चा'बद्दल बोलत राहणार, कधीतरी विद्यार्थ्यांच्या मनातील बातही ऐकून घ्या, पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यास त्यांना विद्यार्थ्यांच्या समस्या समजतील आणि त्यावर तोडगा काढता येईल, असेही दीपके यांनी म्हटले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान जोपर्यंत राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत 'सीजेपी'चे देशभरातील आंदोलन थांबणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

नागपुरात बंदोबस्त 'नीट' पेपरफुटी घोटाळ्यावरून नागपूरमध्ये होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

## श्री गुरुदेव बाल सुसंस्कार शिबिराचा

# अमडापुरमध्ये समारोपीय कार्यक्रम यशस्विरीत्या संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – अमडापूर येथे दिनांक २२ ते ३१ मे दरम्यान श्री गुरुदेव बाल संस्कार शिबिरांचे आयोजन श्री गुरुदेव बालसंस्कार केंद्र अमडापूर येथील स्व.इंदिराबाई देशमुख हायस्कूल येथे गेल्या तीन वर्षापासून सुरू होते, या शिबिराचा समारोप नुकताच पार पडला. या शिबिराचे उदघाटन सामुदायिक प्रार्थनेने रामदास चोरोडे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली व उदघाटन माजी गटशिक्षणाधिकारी दिलीप बुरंगे यांचे उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन अशोक पाचघरे, अमोल गावंडे, दिलीप घाटोळे, मोहन साबळे, डॉ.मीना बंदे, माजी प्राचार्य निलिमा मालपे, अजय देशपांडे, अजय राऊत आदी उपस्थित होते.

शिबिर प्रमुख म्हणुन अशोक खापरे यांनी संपूर्ण जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. ते १५ वर्षापासून श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे कार्य वरुड तालुक्यामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिबीर, भजन स्पर्धा, सण, उत्सव, ग्राम जयंती ग्रामीण भागामध्ये साजऱ्या करतात. या शिबिरामध्ये मुलांना लाठीकाठी, लेझीम अशा प्रकारचे मैदनी खेळ अशोक पाचघरे, प्राणायाम, योगासने अमोल गावंडे, संगीत, भजन, बौद्धिक व इतर मार्गदर्शन अशोक खापरे यांनी १० दिवस मुलांना शिस्त, शांती, गांभीर्य, उठल्या, बसण्या, बोलण्याचे ज्ञान दिले. चोरोडे गुरुजी, अजय देशपांडे व दिलीप बुरंगे यांनी सांगितले की, शिबिराशिवाय आजच्या पिढीमध्ये कोणतेही सुसंस्कार होऊ शकत नाही. शिबिरच आजच्या मुलांना सुसंस्कृत करण्याचे एकमेव साधन आहे. कार्यक्रमाचे संचालन हर्षदा सोनारे, आभार राधिका बेले हिने मानले. कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी अध्यक्षा रमा, लिला बोबडे, रामदास सोनारे, भावेश सोनारे, ओम सोनारे, कृतिका बेले, विनायक ददांडे, श्री गुरुदेव मंडळाच्या संपूर्ण महिला, भगिनी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पावसाळ्यासाठी पश्चिम रेल्वे सज्ज : ट्रॅक सर्किट बिघाड रोखण्यासाठी विशेष उपाययोजना

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – सिग्नल यंत्रणेमध्ये बिघाड होऊन रेल्वे विस्कळीत होऊ नये, यासाठी पश्चिम रेल्वेने विविध उपाययोजना केल्या आहेत.

मुसळधार पावसात ट्रॅक सर्किटमध्ये पाणी साचल्यामुळे होणारे बिघाड कमी करण्यासाठी २३९ डिजिटल ॲक्सल काऊंटर (डीएसी) बसविण्यात आले आहेत. यामुळे पावसाळ्यात लोकल सेवा सुरळीत चालणार आहे. पावसाळ्यात रूळावर पाणी भरल्यास सिग्नल यंत्रणा बिघडते. यामुळे लोकल सेवा विस्कळीत होते. यावर उपाययोजना म्हणून पश्चिम रेल्वेने मुंबई सेंट्रल, गोरेगाव, बोरिवली, कांदिवली, प्रभादेवी आणि भाईदर परिसरात नव्याने डिजिटल ॲक्सल काऊंटर बसवले आहेत. यामुळे चर्चगेट-विरार विभागात एकूण ७७८ ड्युअल डिजिटल ॲक्सल काऊंटर आणि ७७३ डिजिटल ॲक्सल काऊंटर ऑडिओ फ्रिक्वेन्सी ट्रॅक सर्किटसोबत समांतर कार्यरत असणार आहेत. तसेच सर्व सिग्नल उपकरणांचे अर्थिंग तपासण्यात आले आहे. डिजिटल ॲक्सल काऊंटर म्हणजे काय? रेल्वे मार्गावर लोकल आहे की नाही, हे ओळखण्यासाठी डिजिटल ॲक्सल काऊंटर प्रणाली वापरण्यात येते. पाणी किंवा प्रतिकूल हवामानाचा यावर परिणाम कमी प्रमाणात होत असल्याने ही प्रणाली पावसाळ्यात उपयुक्त ठरते.

## जाहीर नोटीस

**विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-२५०/२६ दि.२६/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्रीमती फरजाना तहसीन मुजाहिदउल्लाह खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे फरजाना तहसीन मुजाहिदउल्लाह खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०२/१०/१९६२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२६/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-१५८/२६ दि.०४/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **समीन आफरीन खलील उल्ला खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे समीन आफरीन खलील उल्ला खान, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०८/०४/१९७८** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०४/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-३०९/२५-२६ दि.१७/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शेख अशपाक शेख अजीस, रा.वघाळ, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत वघाळ, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे शेख अशपाक शेख अजीस, रा.वघाळ, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१२/०८/१९७६** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सौंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८१/२०२६ ने.ता.२०/०७/२०२६**

अर्जदार :- १) श्रीमती संध्या प्रफुल्ल अंभोरे, वय अं.४४ वर्ष, धंदा-गृहिणी, २) प्रेरणा प्रफुल्ल अंभोरे, वय अं.२३ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) जानव्ही प्रफुल्ल अंभोर, वय अं.२० वर्ष, धंदा-शिक्षण, सर्व रा.वार्ड क्र.१०, साईसृष्टी कॉलनी, वरुड, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत प्रफुल्ल माणिकराव अंभोरे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# १ लाख ८ हजार ५९६ कासवांची पिल्ले समुद्रात झेपावली : ५६ समुद्रकिनाऱ्यांवरून 'ऑलिव्ह रिडले' कासव संवर्धन उपक्रम

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**रत्नागिरी** – महाराष्ट्र शासनाच्या वन विभागांतर्गत कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि स्थानिक 'कासव मित्र' यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमाला यंदा मोठे यश मिळाले आहे. सन २०२५-२६ च्या हंगामात राज्यातील ५६ समुद्रकिनाऱ्यांवर एकूण १ हजार ७२४ कासवांच्या घरट्यांची नोंद झाली असून, त्यांमधून तब्बल १ लाख ८ हजार ५९६ पिल्लांना यशस्वीरीत्या समुद्रात सोडण्यात आले. यंदाच्या हंगामात उबवण यशाचे प्रमाण ६१.२० टक्के नोंदविण्यात आले आहे. राज्याच्या किनारपट्टीवर रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ९६४ घरट्यांची नोंद झाली असून, तेथून ५४ हजार २२७ पिल्ले समुद्रात झेपावली, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७३८ घरट्यांतून ५३ हजार ३२५ पिल्लांना सुरक्षितपणे समुद्रात सोडण्यात आले. सिंधुदुर्गमध्ये सर्वाधिक ६९.९५ टक्के उबवण यशाची नोंद झाली असून, रायगड जिल्ह्यातील २२ घरट्यांतून १ हजार ४४ पिल्ले समुद्रात सोडण्यात आली. विशेष म्हणजे, यंदा रायगडमधील आरावी, रत्नागिरीतील वेळणेश्वर, वरवडे, नेवरे, ढोकामळे, पूर्णगड, सालदुरे, पानंदे आणि कचरे तसेच सिंधुदुर्गमधील दाभोळी व कोंडुरा या किनाऱ्यांवर प्रथमच कासवांची घरटी आढळली. त्यामुळे ही किनारपट्टी ऑलिव्ह रिडले कासवांच्या प्रजननासाठी महत्त्वपूर्ण अधिवास असल्याचे स्पष्ट झाले आहे. सागरी परिसंस्थेचा समतोल राखणाऱ्या या संरक्षित कासवांच्या संरक्षणासाठी वन विभागाने स्थानिक मच्छिमारांच्या सहकार्याने व्यापक मोहीम हाती घेतली आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४६६/२०२६ ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) बाबाराव पुंडलिकराव बरांगे, वय अं.७५ वर्ष, धंदा-शेती, हु.मु.गुल्हाने वाडी, वरुड, २) विनायक पुंडलिकराव बरांगे, वय अं.४६ वर्ष, धंदा- शेती, ह.मु.मंगलधाम सोसायटी, पांडे लेआऊट, नांदा, नागपुर, ता.जि.अमरावती, ३) श्रीमती.विमल दादाराव बरांगे, वय अं.४१ वर्ष, धंदा- शेती, सर्व मुळ गांव रा.सुरळी, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पुंडलिक लक्ष्मणराव बरांगे व मयत तुळसाबाई पुंडलिक बरांगे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७७/२०२६ ने.ता.२३/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) पांडुरंग महादेवराव आजनकर, वय अं.७८ वर्ष, धंदा-मजुरी, २) विठ्ठल महादेवराव आजनकर, वय अं.७२ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ व २ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ३) कौसल्या शंकरराव ढोरे, वय अं.८५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत महादेव बारकाजी आजनकर व मयत शेवंताबाई महादेवराव आजनकर, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सौंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७८/२०२६ ने.ता.०४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती निर्मलाबाई गुलाबराव राऊत, वय अं.८० वर्ष, धंदा-घरकाम, २) सुभाष गुलाबराव राऊत, वय अं.६५ वर्ष, धंदा- शेती, ३) राजेंद्र गुलाबराव राऊत, वय अं.५८ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ ते ३ रा.जरुड, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत उदेभान रायभान राऊत व मयत अंजनाबाई उदेभानजी राऊत, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सौंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३६६/२०२६ ने.ता.११/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुधाबाई बाबुराव ठाकरे, वय अं.६६ वर्ष, धंदा-घरकाम, २) भुषण बाबुराव ठाकरे, वय अं.४७ वर्ष, धंदा- शेती, ३) रोषण बाबुराव ठाकरे, वय अं.४० वर्ष, धंदा- शेती, ४) लखन बाबुराव ठाकरे, वय अं.३६ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ ते ४ रा.चांदस (वाठोडा), ता.वरुड, ५) सौ.दिक्षा संदीप कडू, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम, रा.सुरळी, ६) सौ.मेघा दिनेश माकोडे, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत बाबुराव झिबलाजी ठाकरे, रा.चांदास (वाठोडा), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# घराचे कुलूप फोडून लाखांचा मुद्देमाल लंपास

**शहरातील आदित्य नगर परिसरातील घटना**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शहरात चोरट्यांनी हैदोस घातला असून गेल्या दोन दिवसांपूर्वी पोस्ट ऑफिस समोर १० लाख रुपयांची चोरी झाल्यानंतर शहरातीलच आदित्य नगर परिसरात चोरट्यांनी सायंकाळी ८ वाजताच्या सुमारास घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरातील सोन्या चांदीच्या दागिन्यासह एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या घटनेने शहरात पुन्हा खळबळ माजली आहे.

शहरातील वार्ड नं.२ मधील आदित्य नगर परिसरात गणेश रामभाऊ नाईक हे परिवारासह राहत असून काल रात्री ८.१५ च्या सुमारास घरी कोणी नसल्याचे संधी साधून घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश करून घरात ठेवलेल्या कपाटातून त्यांच्या पत्नीच्या सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचा रिंग, नथनी असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला या प्रकरणी गणेश रामभाऊ नाईक यांच्या फिर्यादीवरून वरुड पोलिसांनी कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४) भारतीय न्याय संहिता अनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला ३ हेक्टर जागा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पंढरपूरमधील भाविकांच्या सुविधेसाठी निर्णय**



**मुंबई** - पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी राज्यभरातून येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी तसेच गोमाता संवर्धनासाठी राज्य सरकारने यमाई तलावालगतची गट नं. १६१ मधील ३ हेक्टर १२ गुंठे इतकी शासकीय जमीन श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिर समितीला प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी यासंदर्भातील माहिती दिली. मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांनी या जागेची मागणी केली होती. भाविकांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आणि 'गोमाता पालन-संवर्धन केंद्र' याठिकाणी उभारण्यात येणार आहे. तीन वर्षांच्या आत मंजूर प्रयोजनासाठी (गोमाता संवर्धन आणि भाविकांची सुविधा) या जागेचा वापर सुरू करणे बंधनकारक राहील. ज्या कामासाठी जमीन दिली आहे, केवळ त्याच कामासाठी तिचा वापर करता येईल. इतर कोणत्याही तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी वापरासाठी सरकारची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

# 'अल निनो'चा १२ राज्यांना फटका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



*नवी दिल्ली* – भारतातील कमकुवत मान्सूनशी संबंधित असलेल्या 'अल निनो' या हवामान घटकाचा प्रभाव यंदाच्या खरीप हंगामात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि तमिळनाडू या राज्यांसह १२ राज्यांमध्ये 'तुलनेने तीव्र' असण्याची शक्यता कृषी मंत्रालयाने वर्तवली आहे.

'अल निनो'चा प्रभाव पडण्याची शक्यता असलेल्या इतर राज्यांमध्ये महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, ओदिशा, गुजरात, राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश, झारखंड यांचा समावेश आहे.

खरीप २०२६ च्या पूर्वतयारीच्या साप्ताहिक आढावा बैठकीचे अध्यक्षपद भूषवताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, ज्या नऊ ते दहा राज्यांमध्ये 'अल निनो'चा प्रभाव तुलनेने अधिक असू शकतो, तिथे चिन्हांकित जिल्ह्यांचे जिल्हा दंडाधिकारी, कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे आणि इतर विस्तार संस्थांसोबत समन्वित बैठका आयोजित केल्या जाव्यात.

# भरधाव ट्रॅक्टरची दुचाकीला धडक, एकाचा मृत्यू

**तालुक्यातील पुसली फाटयानजीकची घटना**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शेंदुरजनाघाट येथून घरी परत घेऊन येत असताना पुसली फाट्याजवळ समोरुन येणाऱ्या अज्ञात ट्रॅक्टर चालकांने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने चालवुन दुचाकी क्र.एम.एस.२७ ए जे ७२३२ बजाज डिस्कवरला समोरुन जोरदार धडक मारली.

या धडकेत रामु डोमु उईके व एक महिला हे गंभिररित्या जखमी झाले. या अपघातात रामु उईके यांचा मृत्यू झाला. या अपघातातील गंभिर जखमी महिलेला सर्वप्रथम ग्रामीण रुग्णालयात व तेथून जिल्हा ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले.

याप्रकरणी जानराव मैदर कवडेक (५०) रा.भवानीडोह यांचे फिर्यादीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुध्द कलम १०६ (१), २८१, १२५ बी.एन.एस.अन्वये गुन्हा केला आहे.

# सावरकरांनी केले होते ब्रिटिशांकडे १० दयाअर्ज

**पणतू सात्यकी सावरकर यांची न्यायालयात कबुली**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*पुणे* – दया याचिकेच्या माध्यमातून शिक्षा कमी करण्यासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी ब्रिटिश सरकारकडे १० दयाअर्ज केले होते, असे सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात मान्य केले.


लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात दाखल मानहानीच्या खटल्यातील फिर्यादी असलेले सात्यकी यांनी, या माफीपत्रांतील भाषा ही केवळ औपचारिक होती किंवा ती सावरकरांच्या राजकीय रणनितीचा भाग होती, हे सिद्ध करणारा कोणताही तज्ज्ञ अहवाल उपलब्ध नसल्याचेही मान्य केले. पुणे येथील विशेष एमपी/एमएलए न्यायालयाचे न्यायाधीश अमोल शिंदे यांच्या न्यायालयात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल मानहानीच्या खटल्यात सोमवारी फिर्यादी सात्यकी सावरकर यांची राहुल गांधी यांच्यावतीने ॲड.मिलिंद पवार यांनी उलटतपासणी घेतली.

दयेच्या अर्जाची भाषा नम्रतेची होती या उलटतपासादरम्यान फिर्यादी सात्यकी सावरकर यांनी मान्य केले की, त्यांची आई हिमानी सावरकर यांनी पुणे येथील कसबा व कोथरूड विधानसभा मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवली होती आणि दोन्ही वेळा त्यांची अनामत रक्कम जप्त झाली होती.

# कौटुंबिक वाटणीची जमीन मोजणी २०० रुपयांत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोजणीसाठी ९० व ३० दिवसांची नवी कालमर्यादा**



*मुंबई* – राज्य शासनाने जमीन मोजणीच्या शुल्क व वर्गीकरणात मोठे बदल करत सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे.

आता कुटुंबातच झालेल्या वाटणीची मोजणी करावयाची असल्यास ती अवघ्या २०० रुपयांत होईल, तर नियमित मोजणी ९० दिवसांत आणि द्रुतगती मोजणी ३० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नव्या कालमर्यादेमुळे जमीन मोजणीच्या कामाला गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे मोजणी प्रक्रियेतील उशीर आणि भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या निर्णयानुसार, ग्रामीण भागात २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २,००० रुपये, तर शहरी भागात १ हेक्टरपर्यंत ३,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

कौटुंबिक वाटप किंवा संमतीने होणाऱ्या मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा अवघे २०० रुपये शुल्क आकारले जाईल. ग्रामीण भागात २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २,००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी ८,००० रुपये शुल्क द्यावे लागेल. शहरी भागात १ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी ३,००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी १२,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

मोजणी दिवशी गैरहजर राहिल्यास आर्थिक फटका या नवीन नियमांनुसार अर्जदार मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास त्याला मोठा आर्थिक फटका बसू शकतो. मात्र, मोजणीच्या दिवशी स्वतः भूमापक अधिकारी अनुपस्थित राहिल्यास अर्जदाराला कोणतेही पुनर्भेट शुल्क भरावे लागणार नाही, अशी दिलासादायक तरतूदही करण्यात आली आहे.

**उधारीचे पैसे मागितले म्हणुन**

# एकास विट मारुन केले जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – उधारीचे पैसे मागितले म्हणुन एकाने दुसऱ्यास वीट मारुन जखमी केल्याची घटना वरुड शहरात घडली. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खुशाल जनार्दन रडके व महेश पाचघरे हे दोघे एकमेकांच्या ओळखीचे असून खुशाल यांने आरोपी महेशला उधारीचे पैसे दिले होते ते पैसे मागितले, त्या कारणावरुन आरोपी महेश याने शिवीगाळ करुन जमिनीवरील वीट खुशालला मारुन गंभीर जखमी केले.

याप्रकरणी खुशाल जनार्दन रडके (३७) रा.सावता चौक वरुड याचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी महेश पाचघरे रा.शिवाजी नगर वरुड याच्याविरुद्ध ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५) भा.न्या.सं.अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

